पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/694/2019
पुणे 1 दिनांक :- 17/ 5 /2019

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,

सतचित्तानंद एज्यकेशन सोसायटी सर्वे नं.9/1,निगडी,पुणे संचलित विद्यानंद भवन हायस्कूल] नं.9/1,निगडी,पुणे ,पुणे 38 ४४.

विषय:- सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत

संदर्भ - 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1, 6 व 24) 2013
2.शासन निर्णय क्रमांक-एसएफएस-1018/प्र.क्र.1502/एसएम-2, दिनांक-5.3.2019
3. शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे यांचे पत्र जा.क्र.शिउंस/प्राथ-202/स्वंअशाळा/मान्यता/पुवि/2018-/238 दिनांक-18.3.2019

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार खालील अटी व शर्तीवर विद्यमान प्राथमिक शाळेस प्राथ ते उच्चप्राथमिक इ. 1 ली ते इ. 8 वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे .

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग /इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 9 |
| 1 | सतचित्तानंद एज्यकेशन सोसायटी सर्वे नं.9/1,निगडी,पुणे | विद्यानंद भवन हायस्कूल] नं.9/1,निगडी,पुणे ,पुणे 38 | इंग्रजी | नविन शाळा (सी.बी.एस.ई) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) | प्राथमिक ते उच्च प्राथमिक जोडुन इ.1 ली ते इ.8 वी | 2018-19 |

## अटी व शर्ती

1.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

2.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

3.या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.

4.संदर्भ क्रमांक 02 अन्वयेसन 2018-19 मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

5.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहिल.

6 शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

7. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

8. शासन निर्णय क्र. एसएफएस-1018/प्र.क्र.1502/एसएम-2, दिनांक-5.3.2019 मील अटी शर्तीतील मुद्दा क्र.2 चे पुर्ततेच्या अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.

9 महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
1)मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई 32.
2)मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1
3)मा. शिक्षण ...

Scanned by Scanner Go

शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील. शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहीत केल्याप्रमाणेन शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्येविनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ : 4046.86 चौ.मी
- एकूण बांधकामाचे क्षेत्र. 1000 चौ.मी
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ.:- 2500 चौ.मी
- वर्ग खोल्यांची संख्या. :- 18
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली. :-2
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय ? :-

| | मुले | मुली |
|---|---|---|
| संडास | 4 | 4 |
| मुताऱ्या | 12 | 12 |

पिण्याच्या पाण्याची सुविधा : आहे.

- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर. :- लागू नाही.
- अध्यापन अध्ययन साहित्य /खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता. :-आहे
- वाचन साहित्य विन्यासायास उपलब्ध. :-आहे.( ग्रंथालय पुस्तक संख्या-1026 नियतकालिक/वर्तमानपत्र: 1)

मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

8.शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

9.शाळा सोसायटी नोंदणी नियम 1860(1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

10.शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

11.शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

12.तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक प्राथ./स्वंयअशाळा/पिं.चिं.म.न.पा/ / असा आहे तसेच आपल्या शाळेचा U-DISE No.2725 हा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा याची नोंद घ्यावी.

13.मा. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

14.संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

15.जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

Scanned by Scanner Go

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता दिलेल्या परवानगीबाबत
सच्चिदानंद एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित विद्यानंद भवन हायस्कूल, सर्वे नं.९/१, सी.टी.एस. नं.२१८, निगडी, पुणे

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुद्धीपत्रक क्रमांकः एसएफएस-१०२४/प्र.क्र.५३/एसएम-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक: २९ फेब्रुवारी, २०२४

संदर्भः- शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.एसएफएस-१०१८/प्र.क्र.१५०२/एसएम-२, दि.०५.०३.२०१९

शासन शुद्धीपत्रकः-

सच्चिदानंद एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित विद्यानंद भवन हायस्कूल, सर्वे नं.९/१, सी.टी.एस. नं.२१८, निगडी, पुणे ही प्राथमिक ते उच्च माध्यमिक नवीन शाळा (इ.१ ली ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ पासून सुरू करण्यास, अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून संदर्भाधिन शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आली आहे. सदर संस्थेने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने संदर्भाधीन शासन निर्णयातील शाळेचे नाव "विद्यानंद भवन हायस्कूल" ऐवजी "डी.वाय.पाटील वर्ल्ड स्कूल, इंग्रजी माध्यम" असे वाचावे.

२. संदर्भाधिन शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसाच्या आत कळविण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(विवेक सपकाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई ✓ Registered post
३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)

Pune office by hand.

Scanned by Scanner Go